**कलम ४ (१) (ख) (२)**

महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मध्ये पोलीस दलाचे कार्य, कतर्व्य आणि जबाबदा-या याबाबत सविस्तर रित्या नमुद आहे. या कार्यालयातील पोलीस आयुक्त मिरा भाईंदर - वसई विरार पेलीस यांना मदत करण्याकरीता पुढील प्रमाणे पोलीस अधिकारी व कर्मचारी मंजुर झालेले आहेत.

पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीनुसार पोलीस ठाणे व कार्यान्वीत शाखा

| **कार्यालय प्रमुखांचे नाव व पदनाम** | |
|---|---|
| **पोलीस आयुक्त** | |
| **अपर पोलीस आयुक्त** | |
| **पोलीस उप आयुक्त परिमंडळ -०१** | |
| **सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड** | काशिमिरा पोलीस ठाणे |
| | मिरोरोड पोलीस ठाणे |
| **सहाय्यक पोलीस आयुक्त, भाईंदर** | भाईंदर पोलीस ठाणे |
| | उत्तन पोलीस ठाणे |
| **सहाय्यक पोलीस आयुक्त, नवघर** | नवघर पोलीस ठाणे |
| | नयानगर पोलीस ठाणे |
| | |
| **पोलीस उप आयुक्त परिमंडळ -०२** | |
| **सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई** | वसई पोलीस ठाणे |
| | माणिकपुर पोलीस ठाणे |
| **सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळीज** | तुळींज पोलीस ठाणे |
| | वाळीव पोलीस ठाणे |
| | आचोळे पोलीस ठाणे |
| | |
| **पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०३** | |
| **सहाय्यक पोलीस आयुक्त, विरार** | विरार पोलीस ठाणे |
| | पेल्हार पोलीस ठाणे |
| **सहाय्यक पोलीस आयुक्त, नालासोपारा** | नालासोपारा पोलीस ठाणे |
| | अर्नाळा पोलीस ठाणे |
| | |
| **गुन्हे शाखा** | |
| **पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा** | |
| **सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा** | गुन्हे शाखा, कक्ष-१ |
| | गुन्हे शाखा, कक्ष-२ |
| | गुन्हे शाखा, कक्ष-३ |
| | गुन्हे शाखा, मध्यवर्ती कक्ष |
| | गुन्हे प्रशासन |
| | सायबर सेल |
| | अंमली पदार्थ विरोधी पथक |
| | अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक पथक |

| | |
|---|---|
| | होमिसाईड |
| | दहशतवाद विरोधी कक्ष |
| | महिला सहाय्य कक्ष |
| **सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा** | आर्थिक गुन्हे शाखा -०१ |
| | आर्थिक गुन्हे शाखा -०२ |

| | |
|---|---|
| **-: विशेष शाखा :-** | |
| **पोलीस उप आयुक्त, मुख्यालय** | |
| **सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेष शाखा** | विशेष शाखा |
| | सुरक्षा शाखा |
| | सागरी सुरक्षा शाखा |
| | पारपत्र शाखा |
| | परदेशी नागरीक शाखा |
| | मुख्यालय |
| | |
| **पोलीस उप आयुक्त मुख्यालय** | |
| **सहाय्यक पोलीस आयुक्त, मुख्यालय** | पोलीस मुख्यालय |
| | मोटर परिवहन विभाग |
| | पोलीस कल्याण शाखा |
| | प्रशासकीय अधिकारी |
| | प्रशिक्षण शाखा |
| | परवाना शाखा |
| | प्रशासन |
| | अर्ज शाखा |
| | |
| **सहाय्यक पोलीस आयुक्त, नियंत्रण कक्ष** | पोलीस नियंत्रण कक्ष |
| | बिनतारी संदेश विभाग |

# पोलीस अधिकारी व कर्मचारी वर्गाचे कर्तव्य

## -:पोलीस आयुक्तः-

पोलीस आयुक्त हे कार्यालय प्रमुख आहेत. आयुक्तालयातील पोलीस बलाचे निर्देशन आणि देखरेख यासाठी पोलीस आयुक्त जबाबदार असतात. सर्व मोठया समस्यांबाबत विशेषतः अंमलदार वर्ग यांचे प्रशिक्षण व साधन सामग्री पूरवठा आणि भंडार वस्तु बलाचा निर्वाह खर्चासाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतुद वेगवेगळया श्रेणीतील अधिका-यांचे अधिकार व कर्तव्य यांचेशी संबधित सर्व साधारण धोरणाचा समस्यांबाबत निर्णय घेणे. कायदा व सुस्ववस्था राखण्यासाठी आणि गुन्हा प्रतिबंधक व अन्वषण या संबधित कार्यक्षमतेचा गरजे नुसार तपासणी करुन सपंर्क साधणे होते पोलीस आयुक्त याची सर्वसाधारण कर्तव्य असतात. त्यांचे अधिपत्याखाली वर्ग १,२,३ चे पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच कार्यालयीन कर्मचारी कार्यरत असतात.

## -:अप्पर पोलीस आयुक्तः-

अप्पर पोलीस आयुक्त हे पोलीस आयुक्ताना सहाय्यक अधिकारी म्हणुन निर्माण केलेल पद आहे. अप्पर पोलीस आयुक्त हे त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शाखा व कार्यालयातील अधिकारी / अंमलदार यांना योग्य ते मार्गदर्शन करतात. तसेच कायदा व सुव्यवस्था राखणे याबाबत योग्य मार्गदर्शन करीत असतात.

## -:पोलीस उप आयुक्तः- (परिमंडळ)

पोलीस उप आयुक्त (परिमंडळ १,२ आणि ३) यांचे नियंत्रणाखाली मिरा भाईंदर- वसई विरार पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाणे अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था, गुन्हयावर नियंत्रण, गुन्हेगारी प्रतिबंध/अन्वेषण तपास करण्याचे काम पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी योग्य व कार्यक्षम रितीने करीत असल्याची खातरजमा करणे, अधिकारी / अंमलदार वर्गास शिस्त लागु करण्यासाठी तसेच त्यांची ग-हाणी मिटवण्यासाठी पोलसी ठाणेस अनपेक्षीत भेटी देवुन अधिकारी / कर्मचारी दक्ष आहेत किंवा हे पाहणे, परिमंडळातील सर्व पोलीस ठाण्याची वार्षिक तपासणी घेणे, मासिक भेटी देणे, वार्षिक तपासणी दरम्यान कर्मया-याचे सेवा अभिलेख पडताळणी करुन शेरे नोंदविणे, परिमंडळातील गुन्हयाचा आढावा घेवुन गंभीर अपराध्याच्या ठिकाणी परिस्थितीनुसार भेटे देणे हे पोलीस उप आयुक्त परिमंडळ यांचे कर्तव्य आहे. सदर कामी यांचे अधिपत्याखालील सहा. पोलीस आयुक्तांना आवश्यक असेल तेव्हा मार्गदर्शन व सुचनाही देउ शकतात.

## -:पोलीस उप आयुक्तः- (मुख्यालय)

पोलीस उप आयुक्त मुख्यालय यांचे नियत्रणाखाली पोलीस कार्यालयातील प्रशासनीक शाखा, मोटार परिवहन विभाग, विनतारी संदेश विभाग आणि पोलीस मुख्यालय हे विभाग त्यांना सदर शाखांचे कामकाज पाहणसाठी सहाय्यक अधिकारी महणुन काम पाहतात त्यांच्या नियत्रणाखालील विभागांवर सर्वसाधारण देखरेख ठेवण्यास ते जबाबदार आसतात. १० वर्षा वरील पोलीस अंमलदार यांचे वार्षिक शेरे लिहीणे. मुख्य पोलीस कार्यालयाच्या नियत्रणाचे अधिन राहुन करमणुक, मनोरंजन, खाद्यगृहे, सार्वजनिक ठिकाणी ध्वनिक्षेपकांचा वापर इत्यादीच्या संबधातील रितसर परवाने देण्याचे काम पाहतात. पोलीस मुख्यालय येथील देखरेखीकामी राखीव पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकरी कार्यरत असुन पोलीस मुख्यालयातील कार्यकारी दलावर त्याचे नियत्रण असते.

या व्यतिरीक्त कार्यालयातील प्रशासनीक शाखा, आस्थापना शाखा, पत्र व्यवहार शाखा, लेखा शाखा, वाचक शाखा, इत्यादीचे कामकाज त्यांचे नियंत्रणाखाली चालते. आस्थापना शाखेमध्ये पोलीस अधिकारी/ कर्मचारी/वर्ग-३, लिपीक संवर्ग/ वर्ग-४ कर्मचारी यांची आस्थापना त्यांचे वेतन व भत्ते, रजा आदेश निर्गमीत करणे प्रशिक्षण पोलीस भरती प्रक्रिया, शिक्षा, बक्षीसे, सेवानिवृत्ती, वेतन वाढ, सेवा जेष्ठता, पदोन्नती सेवाजेष्ठता सुची तयार करणे, विभागीय चौकशीचे कामकाज इत्यादी कामे आहेत.

१० वर्षावरिल पोलीस कर्मचारी यांचे वार्षिक शेरे, पोलीस अधिकरी व मंत्रालयीन कर्मचारी यांचे गोपनिय अहवाल लिहिणे, क्राईम युनिट यांना भेटी देण, महत्वाच्या गुन्हयामध्ये मार्गदर्शन सुचना देणे, प्रशासकिय कामकाज पाहणे.

पोलीस उप आयुक्त विशेष शाखा यांचे नियंत्रणाखाली राजकीय, शासकिय, निमशासकिय व सर्व पक्षाच्या हालचालीची माहिति संकलित करुन घेणे. विविध बंदोबस्त योजना कार्यान्वीत करणे, पारपत्र शाखा, विदेशी नागरीक शाखेचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे १० वर्षावरील पोलीस कर्मचारी यांचे वार्षिक शेरे लिहीणे.

मिरा भाईंदर- वसई विरार शहरातील वाहतुक ही तीन विभागात विभागलेली असुन हे तीन विभाग सहा. पोलीस आयुक्त वाहतुक -१ (काशिमिरा, घोडबंदर, नयानगर, मिरारोड, भाईंदर, उत्तन), सहा. पोलीस आयुक्त वाहतुक २ ( वसई, नवघर माणिकपुर, तुळींज, वाळीव, नायगाव), आणि सहा. पोलीस आयुक्त – ३ ( नालासोपारा, विरार, बोळींज, मांडवी, अर्णाला, कन्हेर, पेल्हार) यांचे देखरेखी खाली कार्यन्वीत आहेत. पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक आणि पोलीस कर्मचारी वर्ग यांचे मदतीने शहरातील सर्व वाहतुक मार्गावर नियत्रण ठेवणे, वाहतुक मार्गाचरील बंदोबस्तचे आयोजन व नियंत्रण तसेच सर्व समस्या सोडविणे वाहतुकीचे नियमानुसार नियमांचे भंग करणा-यावर मोटार वाहन कायदयाप्रमाणे केसेस करुन दंड वसुल करणे. १० वर्षा वरील पोलीस कर्मचारी यांचे वार्षिक शेरे, पोलीस अधिकारी व मंत्रालयीन कर्मचारी यांचे गोपनिय अहवाल लिहिणे.

## -:सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्यालय):-

सहाय्यक पोलीस आयुक्त हे माहिति अधिकरी –जनमाहिती अधिकरी असतात. मुख्यालयातील मंत्रालयीन कर्मचारी, पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे. १० वर्षा आतिल पोलीस कर्मचारी यांचे वार्षिक शेरे लिहीणे, पोलीस अधिकरी यांचे गोपनिय अहवाल लिहीणे. प्रशासकिय कामकाज पाहणे, रात्रपाठी गस्ती दरम्यान पोलीस ठाणेस भेट देणे.

## -:सहाय्यक पोलीस आयुक्त (विशेष शाखा):-

विशेष शाखा हि देखील नियंत्रणाखाली असुन राजकीय, शासकिय, निमशासकिय व सर्व पक्षाच्या हालचालीची माहिति संकलित करुन घेणे. विविध बंदोबस्त योजना कार्यान्वीत करणे, पारपत्र शाखा, विदेशी नागरीक शाखेचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे.सागरी सुरक्षा व सुरक्षा शाखेच्या कामावर नियंत्रण ठेवणे.

## -:सहाय्यक पोलीस आयुक्त (विभागिय) :-

सहाय्यक पोलीस आयुक्त हे माहिती अधिकरी —जनमाहिती अधिकरी असतात. पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे व गुन्हे प्रतिबंध करणे. विशेष कार्यकारी अधिकारी या पदाचा कार्यभार असुन प्रतिबंधक कार्यावाही खालील दाखल होणा-या गुन्हयाचे कामकाज व त्या व्यतिरिक्त नियंत्रणाखाली असलेल्या खालील पोलीस ठाण्याच्या सर्व कामकाजावर नियत्रण ठेवणे. १० वर्षा आतिल पोलीस कर्मचारी यांचे वार्षिक शेरे लिहीणे, पोलीस अधिकरी यांचे गापनिय अहवाल लिहीणे. प्रशासकिय कामकाज पाहणे, पोलीस ठाणे भेट, दोषारोपपत्राची पडताळणी करणे, पोलीस स्टेशन येथे दाखल होणा-या वार्षिक निरिक्षण घेणे, तडीपार प्रकरणाबाबत चौकशी करणे, तडीपार प्रकरणाचे अहवाल पाठविणे, वरिष्ठांकडुन प्राप्त होणा-या अर्जाची चौकशी करणे.

## -:पोलीस निरीक्षक / प्रभारी अधिकारी :-

१. पोलीस निरीक्षक / प्रभारी अधिकारी त्यांच्या प्रभारातील क्षेत्रातील गुन्हयाच्या प्रतिंबध आणिक तपास तसेच त्यांच्या वरिष्ठांचे ओदेश अंमलात आणणे, त्यांच्या हाताखालील कर्मचा-यांमध्ये योग्य प्रकारे शिस्त राखली जात आहे, हे पाहण्यासाठी फौजदार हे जबाबदार असतात. त्यांनी त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या कामाची सांगोपांग माहिती करुन घ्यावी व त्यांच्या हाताखालील सर्व पोलीस कर्मचारी कर्तव्यावर हजर असुन, कर्तव्यदक्ष आहेत हे पाहावे. सार्वजनिक शांततेला बाधक ठरणारा कोणताही गुन्हा किंवा प्रसंग घडण्याची शक्यता पोलीस निरीक्षक/ प्रभारी अधिकारी यांना माहिती होईल तेव्हा त्या शक्यतेची माहिती, त्यांना जी खबरदारीची उपाययोजना करणे त्यांना उचित वाटेल त्या उपाययोजनेसह त्यांच्या सर्व वरिष्ठ अधिका-यांना कळवतील. आवश्यतेनुसार तेव्हा तेव्हा ते शेजारच्या पोलीस ठाण्याच्या पोलीस प्राधिका-याबरोबर थेट पत्रव्यवहार करतील आणि प्रभारातुन निसटुन जाणा-या अथवा निसटुन जावून त्यांच्या प्रभारात येणा-या अपराध्यांना पकडण्यासाठी त्या प्राधिका-याबरोबर एक विचाराने कार्यवाही करतील आणि सर्वसाधारणपणे गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी किंवा त्याचा तपास लावण्यासाठी उपाय योजतील. पोलीस निरीक्षक एखाद्या विशिष्ठ प्रकरणाचा तपास व्यक्तीशः हाती घेईल तेव्हा फौजदार हे त्यांच्या आदेशानुसार कार्य करतील. तथापी यामुळे ते त्यांच्या उपरोल्लिखीत जबाबदा-यांमधुन मुक्त होणार नाही आणि दंडाधिका-यांकडुन अनुज्ञेश मिळाल्याखेरीज पोलीसांना कार्यवाही करणे शक्य होणार नाही अशी प्रकरणे नसतील तर आदेशांसाठी न थांबता ते सर्व प्रकरणामधील त्याचे कार्य ताबडतोब सुरु करतील.

२. पोलीस आयुक्त / अप्पर पोलीस आयुक्त/ पोलीस उप आयुक्त/ सहा. पोलीस आयुक्त निर्देश देतील अशा रितीने पोलीस निरीक्षक/ प्रभारी अधिकारी त्याच्या प्रभागातील पोलीसांची ठराविक काळाने तपासणी करतील. बलातील व्यक्तीनी केलेला कोणताही निष्काळजीपणा, गैरवर्तणुक किंवा आदेशाची अवज्ञा, रजेशिवाय अनुपस्थिती किंवा त्यांना झलेला अपघात यांचे वृत्त पोलीस आयुक्त/अप्पर पोलीस अयुक्त/ पोलीस उप आयुक्त/सहा. पोलीस आयुक्त यांना कळवतील आणि एकंदरीत त्यांच्या स्वतःच्या पोलीस ठाण्यामधील सुव्यवस्था रक्षणाच्या व्यवस्थच्या क्षमतेशी संबधील सर्व बाबीची माहिती वरिष्ठांना सतत पूरवतील.

3 . पोलीस निरीक्षक / प्रभारी अधिकारी त्यांच्या प्रभारातील चौक्यांची महिण्यातुन निदान एकदा तपासणी करावी व अशावेळी चौक्यामधिल त्याच्या शिपायांना त्याच्या कर्तव्याबदल सुचना दयाव्यात.

४. त्यांना त्याच्या पोलीस ठाणेच्या कक्षेतील गावांना भेट देवुन पोलीस भेट नोंद पुस्तके व हजेरी पट तपासावेत व नियम ७६ मध्ये अर्तभूत असतलेल्या तरतुदी दृष्टी समोर ठेवुन गावातील गुन्हे संबधिच्या नोंद वहया अद्यावत करुन घ्याव्यात. त्यांच्या प्रभारात चालु घडणा-या चालु घडामोडीची माहिती मिळण्यासाठी प्रत्येक संधी त्यांनी साधावी. आणि त्यांच्या सभोवतालच्या लोकांशी विशेषतः गुंड व संशयीत व्यक्तीची खरीखुरी माहिती त्यांना असावी. त्यांच्या हाताखाली व्यक्ती बारीक सारिक माहिती मिळण्यासाठी एकही संधी दडवणार नाही हे पोलीस निरीक्षक / प्रभारी अधिकारी यांनी पाहावे.

## -:पोलीस हवालदारांचे कर्तव्य:-

**अ.** हवालदार हे त्यांचे वरिष्ठ म्हणुन नेमलेल्या फौजदारांच्या आणि पोलीस बलातील वरिष्ठ अधिका-यांच्या आदेशाचे आधिन असतात. हवालदारांना नेमुण देण्यात येईल त्याप्रभाराच्या मर्यादेमध्ये त्यांना दुय्यम असना-या सर्व पोलीसांकडुन आज्ञा पालन करुन घेण्यास ते हक्कदार असता

ब. हवालदारांनी त्यांच्या प्रभारात घडणारे सर्व गुन्हे आणि दखलपात्र अपराध घडणार असल्या संबधीचे कोणतीही संभवनिहता त्याच्या फौजदारांना कळविणे आवश्यक असते. परंतु अपराध्याना शोधुन त्यांना पकडण्यासाठी आवश्यक ती चौकशी सुरु करण्यासाठी त्यांना आदेश मिळण्यासाठी त्यानी थांबुन राहता कामा नये.

क. गुन्हयास प्रतिबंध करताना व सुव्यवस्था राखताना हवालदार त्यांचे वरिष्ठ अधिकारी त्यांना देखिल अशा आदेशाचे पालन करतील.

ड. अचानक किंवा संशयास्पद रितीने झालेल्या मृत्युच्या बाबती हवालदार किंवा हवालदार नसेल तर शिपाई त्याला फौजदाराकडुन किंवा अन्य वरिष्ठ अधिका-यांकडुन आदेश मिळेपर्यत प्रेत जाळण्यास,पुरविण्यास किंवा (पारश्यांच्या प्रथेप्रमाणे) टाकुन देण्यास प्रतिबंध करतील.

ई. गावातील विशिष्ठ नाक्यांच्या किंवा गस्त क्षेत्राच्या प्रभार हवालदाराकडे असेल. त्यावेळी ते पोलीस व्यवस्थाविषक सर्व बाबींमध्ये ग्राम पोलीस प्रमुखा प्रमाणे एक विचाराने कृती करतील.

फ. हाताखालील पोलीसांनी देखील कर्तव्यात केलेल्या हयगयीची आणि कोणत्याही आदेशाची अवज्ञा केल्याची किंवा त्याच्या इतर गैरवर्तनाची सर्व प्रकरणी वरिष्ठ अधिका-याच्या तात्काळ निदर्शनास आणुन देण्यास हवालदारांना जबाबदार मानण्यात येईल.

ग. हवालदार हे फौजदाराचे सहाय्यक असतात. आणि त्यांनी फौजदारांना शिपाईची कवायत घेण्याचा शिकविण्याचा कामात व नाक्यावर वारंवार गस्त घालण्याच्या कामात सहाय्य करावे. शिपायांनी केलेली कोणतीही हयगय ताबडतोब पोलीस निरीक्षकांना कळविण्यात यावी. तसेच त्याच्या प्रशसनिय कृतीही वरिष्ठांच्या निदर्शनास आणुन दयाव्यात.

## -:पोलीस शिपाई यांचे कर्तव्य:-

१. गुन्हयास प्रतिबंध व त्यांचा तपासकरणे कायदा व सुव्यवस्था राखणे, फौजदार प्रक्रिया संहिते नुसार दंडाधिका-यांचे वॉरंट आवश्यक असल्यास त्याबाबतीत वॉरंटवर अपराध्यांना पकडुन त्यांचे ताब्यात देण्यात येतील. असे कैदी निधी किंवा खाजगी व सरकारी मालमत्ता यांचे सोबत संरक्षण म्हणुन जाणे व त्यावर पहारा करणे आणि मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या नियम २२ अन्वये पोलीस अधिका-यांना प्रधान करण्यात आलेल्या अधिकारानुसार हवालदार व वरिष्ठ अधिकरी हे ओदश देतील अशा पोलीस व्यवस्थेविषयक कामे शिपाई पार पाडतील.

२. ज्या गुन्हयांसाठी पोलीस वॉरंट वाचुन अटक करु शकतात असा कोणताही गुन्हा घडल्यावर शिपायांने आदेशाची वाट न पाहता, सहक-यांचे माहितीसाठी ताबडतोब आणि व्यवहार्य असेल तेथे लेखी अहवाल दयावा.

३. आग लागल्याच्या किंवा इतर कोणत्याही संकटाच्या प्रसंगी सहाय्य करणे व जनतेच्या सुरक्षेतेसाठी आवाक्यात असेल ती प्रत्येक खबरदारी घ्यावी. हे देखिल शिपायांचे कर्तव्य असेल.

४. नित्याचे गस्तीचे कर्तव्य शिपाई पार पाडणार नाही गावामध्ये फेरफटका मारुन काय माहिती मिळते काय हे पाहण्यासाठी शिपायांचा उपयोग करावयाचा नसतो. गस्त वाल्याच्या क्षेत्रात येणा-या कोणत्याही कर्तव्यासाठी शिपायांचा वापर करावयाचा असेल तेव्हा त्याला नेमक्या सुचना देण्यात आल्या पाहिजे.

## -:पोलीस  निरिक्षक परिवहन शाखा:-

१.मोटर परिवहन अधिकारी ह त्यांचे जेथे नियुक्ती आहे तेथील विभागाचे थेट प्रभारी अधिकारी राहतील.

२. ते प्रशासकिय बाबतीत पोलीस आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली असतील आणि तांत्रिक बाबतीत पोलीस  उप महानिरीक्षक मोटार परिवहन विभाग पुणे यांच्या नियत्रंणाखाली असतील

३. त्यांचे प्रभारातील सर्व वाहनाचा अधुनमधुन पूर्ण तपासणी करीता आणि शक्यता नेहमीच वाहाणे सुव्यवस्थित ठेवण्याकरीता जबाबदार असतील.

४. त्यांच्या प्रभारामधिल खाली सर्व शाखांवर ते नियंत्रण ठेवुन देखरेख करतील.
अ) वाहन दुरुस्ती आणि परिक्षण, क) भंडाराचा व्यवहार (पेट्रोल, ऑईल, वंगन, व सुटटे भाग इ.) ड) मोटार परिवहनचे विविध अभिलेख ठेवणे, ई) प्रशासकिय अभिलेख ठेवणे.

५. त्यांच्या प्रभारातील मोटार परिवहन विभागाचे तपासणी वरिष्ठांनी करण्यासाठी जरुर ती व्यवस्था ते करतील. आणि सर्व भंडार, खतावणी(लेजर) आणि इतर मोटर परिवहन अभिलेख अध्यावत ठेवतील तसेच जरुर ती कारवाई करतील. सुचना आणि तपासणी टिपण्णीची पूर्तता करतील.

६. त्यांच्या कनिष्ठ कर्मचा-यांना योग्य प्रकारे कर्तव्य वाटप केले जातील याबाबत ते खात्री करतील आणि त्यांची कार्यक्षमता व शिस्त राखतील.

७. अधिनियमितता बेशिस्त वाहनांचा गैरवापर अद्यावत इत्यादी बाबतची प्रकरणे ते नचुकता आपले वरिष्ठ अधिकरी यांच्या निदर्शनास आणुन देतील. पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग यांच्या आधिपत्याखाली खालील कर्मचारी काम करतात. १. मोटर परिवहन पर्यवेक्षक २. पोलीस हवालदार, चालक यांत्रिकी(मॅकनिक)

## -:लेखा शाखा:-

लेखा शाखेमध्ये वर्ग- १ ते ४ अधिकारी / कर्मचारी वर्गाचे वेतन व इतर भत्ते/आकस्मिक खर्चाचे देयक तयार करणे, रक्कमांचे वाटप करणे, पोलीस आयुक्तालयासाठी विविध प्रकारचे अनुदाने शासनाकडे वार्षिक अंदाज पत्रके पाठवुन मंजुर करुन घेणे इत्यादी कामकाज करणे.

## -:पत्रव्यवहार शाखा :-

पत्रव्यवहार शाखेत अधिकारी आस्थापना, लिपीक वर्ग / वर्ग चार आस्थापना या व्यतिरीक्त प्रबंधक शाखेत आवक, जावक, बारनिशी, टपाल निर्गती, स्टेशनरी तसेच कार्यालयीन कामकाजसाठी विविध साहित्यांची खरेदी करणे इ. कामे येतात.

इमारत शाखेत कार्यलयीन / पोलीस ठाणे कडील इमारती यांची देखभाल, दुरुस्ती, भुखंड आरक्षण तसेच प्राप्त होणा-या अनुदानानुसार शासकिय इमारतीचे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधकाम पूर्ण करुन घेणे. इ. कामे येतात.

त्याच प्रमाणे पोलीस अधिकारी/ कर्मचारी वर्गास निवास्थाने वाटप, विद्युत देयक, पाणीपट्टी, टेलिफोन, आरोपी आहार भत्ता, घरपट्टी देयक देयके मंजुर करणे, पोलीस अधिकारी/ कर्मचा-यांची वैद्यकिय परिपूर्ती देयके मंजुर करणे, दुरध्वनी देयके मंजुर करणे इ.काम स्वतंत्र कक्षा मार्फत करण्यात येतात.

## -:अर्ज चौकशी शाखा:-

अर्ज शाखेकडे विविध पोलीस ठाणे शाखा अतंर्गत प्राप्त झालेले स्थानिक तक्रार अर्ज/ शासनाकडे /मुख्य मंत्र्याकडील/ उपमुख्यमंत्र्याकडील/ पोलीस महासंचालक यांचे कडील तक्रार अर्ज अखत्यारितीनुसार संबधित पोलीस ठाणे/ शाखेस चौकशी कामी पाठविणे. आणि उचित कारवाई अंती अहवाल सादर करणे. जिल्हा / विभागिय लोकशाही दिनातील प्राप्त अर्जावर तसेच जिल्हा / विभागीच भ्रष्टाचार निमूर्लन समितीतील अर्जावर अहवाल सादर करणे. हि कामे येतात. या व्यतिरिक्त माहिती अधिकार अधिकनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जावर मुदतीत कार्यवाही करुन अर्जदारास मुदतीत तपशिल उपलब्ध करुन देणे हि कामे अर्ज चौकशी शाखे मार्फत करण्यात येतात.

## -:परवाना शाखा:-

परवाना शाखेकडे शस्त्र परवना, सिनेमा परवाणा नुतनिकरण, व्हिडीओ सिनेमा नुतनीकरण, स्पोटक परवाने(शोभेची दारु), रॉकेल परवाणे, खाजगी सुरक्षा एजन्सी परवाने, सायबर कॅफे जागेचा अहवाल, एफ.एल. -३, सी.एल.-२, पेट्रोलीयम, गॅस नाहरकत प्रमाणपत्र, मंजुरी, तसेच करमणुकीचे कार्यक्रमांना मंजुरी देणे व परवाण्याचे नुतरीकरण करण्याचे काम आहे.

## -:पोलीस कल्याण विभाग:-

पोलीस कल्याण शाखेकडे पोलीस कल्याण निधीमधुन पोलीस अधिकारी / कर्मचा-यांना विविध अनुधान वाटप, महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेचे कामकाज व तत्स संबधि कामे करण्यात येतात. त्याच प्रमाणे पोलीस कल्याण निधी वृध्दींगत करण्यासाठी विविध सांकृतीक कार्यक्रामचे आयोजन करुन निधी जमा करण्यात येतो. तसेच पोलीस बॅन्ड पथक विविध कार्यक्रमासाठी पूरविणे, त्यांच्यासाठी लागणारे साहित्य खरेदी करणे, क्रिडा साहित्य खरेदी करणे, इत्यादी कामे करण्यात येतात.

# पोलीस आयुक्त कार्यालय, मिरा–भाईदर, वसई–विरार

## पोलीस अधिकारी यांचे मंजुर/हजर/रिक्त पदांची माहिती

| अ. क्र | तपशिल | पोलीस आयुक्त | अपर पोलीस आयुक्त | पोउपआ | सपोआ | पोनि | सपोनि | पोउपनि | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजुर | १ | १ | ५ | १३ | ७३ | १०९ | २२४ | ४२६ |
| २ | हजर | १ | १ | ५ | १२ | ६७ | ९२ | १७९ | ३५७ |
| ३ | रिक्त | ० | ० | ० | १ | ६ | १७ | ४५ | ६९ |
| ४ | बदलुन येणारे | ० | ० | ० | ० | १ | १ | ६ | ८ |
| ५ | बदलुन जाणारे | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| ६ | संपुर्ण बदलुन आयुक्तालयाच्या रिक्त जागा | ० | ० | ० | १ | ३ | १६ | ४१ | ६१ |

| मिरा–भाईदर, वसई–विरार आयुक्तलयात कार्यरत पोलीस अधिकारी | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **पोलीस आयुक्त** | | | | | |
| **अ. क्र** | **नाव** | **हृद्दा** | **पुर्वीची नेमणुक** | **दिलेली नेमणुक** | |
| **१** | **श्री.सदानंद दाते** | **पोलीस आयुक्त** | **सी.बी.आय. दिल्ली** | **पोलीस आयुक्त मि. भा.व.वि.** | 04-09-2020 |
| **अपर पोलीस आयुक्त** | | | | | |
| **अ. क्र** | **नाव** | **हृद्दा** | **पुर्वीची नेमणुक** | **दिलेली नेमणुक** | |
| **१** | **श्री.एस.जयकुमार** | **अपर पोलीस आयुक्त** | **सशस्त्र दल, नायगाव, मुंबई** | **अपर पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.** | 14-09-2020 |
| **पोलीस उप आयुक्त** | | | | | |
| **अ. क्र** | **नाव** | **हृद्दा** | **पुर्वीची नेमणुक** | **दिलेली नेमणुक** | हजर दिनांक |
| १ | श्री.महेश पाटील | पोउपआ | लाचलुचपत प्र वि,ठाणे | पोउपआ, गुन्हे | 24-02-2021 |
| २ | श्री.विजयकांत सागर | पोउपआ | अ.पो.अ. वसई | पोउपआ,मुख्यालय | 12-10-2020 |
| ३ | श्री.अमित काळे | पोउपआ | ठाणे शहर | पोउपआ, परि–१,मिरा–भाईदर | 29/10/2020 |
| ४ | श्री.संजयकुमार पाटील | पोउपआ | ठाणे ग्रामिण | पोउपआ,परि–२, वसई | 05-10-2020 |
| ५ | श्री.प्रशात वाघुंडे | पोउपआ | पो.प्र.के.अकोला | पोउपआ,परि–३, विरार | 18-11-2020 |
| **सहायक पोलीस आयुक्त** | | | | | |
| **अ. क्र** | **नाव** | **हृद्दा** | **पुर्वीची नेम** | **दिलेली नेमणुक** | हजर दिनांक |
| १ | श्री.पंकज नवनाथ शिरसाट | सपोआ | ठाणे शहर | स.पो.आ तुळींज | 20-01-2021 |
| २ | श्री.विनायक नरळे | सपोआ | ठाणे शहर | स.पो.आ, मुख्यालय, अति का. विशेष शाखा | 21-01-2021 |
| ३ | श्रीमती.पद्मजा बढे | सपोआ | सपोआ ठाणे शहर | स.पो.आ, आर्थिक गुन्हे शाखा | 01-10-2020 |
| ४ | श्री.शशीकांत भोसले | सपोआ | ठाणे ग्रामिण वर्ग | स.पो.आ,नवघर | 01-10-2020 |
| ५ | श्री.अमोल मांडवे | स्पोआ | सपोआ तुळींज | स.पो.आ. गुन्हे शाखा | 08-10-2021 |
| ६ | श्री.सुर्यकांत गायकवाड | सपोआ | मुंबई शहर | स.पो.आ, वाहतुक विभाग | 15-01-2021 |
| ७ | श्री.कैलास संपतराव चव्हाण | सपोआ | मुंबई शहर | स.पो.आ नियंत्रण कक्ष | 15-01-2021 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | श्री.विलास सानप | सपोआ | जा.पडताळणी, अकोला | स.पो.आ, मिरा रोड | 06-10-2020 |
| ९ | श्री.चंद्रकांत जाधव | सपोआ | मुख्यालय,मि.भा. व.वि | स.पो.आ, नालासोपारा | 02-01-2021 |
| १० | श्री. रामचंद्र बाबुराव देशमुख | सपोआ | नवी मुंबई | स.पो.आ. विरार | 02-01-2021 |
| ११ | श्री.प्रदीप गिरीधर | सपोआ | ठाणे शहर | स.पो.आ वसई विभाग | 11-01-2021 |
| १२ | श्री. शांतीलाल जाधव | सपोआ | मुंबई शहर | स.पो.आ,भाईदर | 05-11-2020 |

## पोलीस निरीक्षक

| अ. क्र | नाव | हृद्दा | पुर्वीची नेमणक | दिलेली नेमणुक | हजर दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | संजय दत्तू हजारे | पोनि | ठाणे ग्रा | काशिमिरा पोस्टे | |
| २ | संदिप सिताराम कदम | पोनि | ठाणे ग्रा | मिरारोड पोस्टे | |
| ३ | विजयकुमार अधिकराव चव्हाण | पोनि | ठाणे ग्रा | मिरारोड पोस्टे | |
| ४ | कैलास वसंत बर्वे | पोनि | ठाणे ग्रा | प्रभारी, वालीव पो.स्टे | |
| ५ | संपतराव शंकरराव पाटील | पोनि | ठाणे ग्रा | अनैतिक मानवी वाहतुक, काशिमिरा | |
| ६ | शेखर बसवेश्वर डोंबे | पोनि | ठाणे ग्र वर्ग | वाहतुक शाखा, वर्स युनिट | |
| ७ | अनंत चाहु पराड | पोनि | पालघर वर्ग | आर्थिक गुन्हे शाखा | |
| ८ | राजेंद्र गणपत कांबळे | पोनि | पालघर वर्ग | तुळींज | |
| ९ | विलास यशवंत चौगुले | पोनि | पालघर वर्ग | प्रभारी,पेल्हार पो.स्टे | |
| १० | वसंत चंद्रकांत लब्दे | पोनि | पालघर वर्ग | आर्थिक गुन्हे शाखा | |
| ११ | सुरेश हरिभाउ वराडे | पोनि | पालघर वर्ग | विरार | |
| १२ | विवेक शांताराम सोनावणे | पोनि | पालघर वर्ग | सुरक्षा शाखा | |
| १३ | महेश विदयाधर शेटये | पोनि | पालघर वर्ग | पोलीस निरीक्षक, प्रशासन | |
| १४ | विलास सखाराम सुपे | पोनि | पालघर वर्ग | प्रभारी, नालासोपारा पो. स्टेशन | |
| १५ | आनंदा तिरूनाईक मुदलीयादर | पोनि | पालघर वर्ग | आर्थिक गुन्हे शाखा | |
| १६ | जितेंद्र बोदप्पा वनकोटी | पोनि | पालघर वर्ग | प्रभारी, नयानगर पो.स्टे | |
| १७ | भास्कर नाना पुकळे | पोनि | पालघर वर्ग | गुन्हेशाखा | |
| १८ | भाउसाहेब किसन आहेर | पोनि | ठाणे ग्रा | माणिकपुर पो.स्टे | |
| १९ | चंद्रकांत सुधाकर सरोदे | पोनि | नंदुरबार | प्रभारी आचोळे पो.स्टे | |
| २० | प्रमोद अशोकराव बडाख | पोनि | मुंबई शहर | गुन्हेशाखा | |
| २१ | कल्याण एकनाथ कर्पे | पोनि | ठाणे शहर | वसई प्रभारी | |
| २२ | राजु किसन माने | पोनि | विसुवि | प्रभारी, अर्नाळा पो.स्टे | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | वैशाली भिकु मोरे | पोनि | नि.क मुंबई | आगुशा,अति.सायबर | |
| २४ | प्रफुल रमेश वाघ | पोनि | मुंबई शहर | विरार पो.स्टे | |
| २५ | रमेश पंढरीनाथ भामे | पोनि | ठाणे शहर | वाहतुक शाखा, परि–१, | |
| २६ | शैलेंद्र रघुनाथ नगरकर | पोनि | दविप | नियंत्रण कक्ष | |
| २७ | मुगटलाल भानुदास पाटील | पोनि | सातारा | प्रभारी भाईदर पो.स्टे | |
| २८ | विजय सुकदेव पवार | पोनि | गोंदिया | काशिमिरा पोस्टे | |
| २९ | विजयसिंग बाळासाहेब बागल | पोनि | मुंबई शहर | प्रभारी, मिरारोड पो.स्टे | |
| ३० | प्रशांत के लांगी | पोनि | मुंबई शहर | उत्तन पो.स्टे | |
| ३१ | रणजित सुर्यकांत आंधळे | पोनि | नागपुर शहर | परवाना शाखा, मि.भा.व.वि | |
| ३२ | मिलिंद मनोहर देसाई | पोनि | अनु.ज.प्र स औरंगाबाद | प्रभारी नवघर पो.स्टे | |
| ३३ | सुनिल निवृत्ती गवळी | पोनि | मुंबई शहर | आचोळे पो.स्टे | |
| ३४ | श्याम आदीनाथ आपेट | पोनि | पो.प्र.के.नागपुर | तुळींज पो.स्टे | |
| ३५ | अविराज अरुण कुराडे | पोनि | वि.सु.वि,मुंबई | गुन्हे शाखा–१ | |
| ३६ | दादाराम सुभाष कारंडे | पोनि | गु.अ.वि मि.भा.व.वि | वाहतुक विभाग, विरार | |
| ३७ | सचिन भारत कोतमिरे | पोनि | आ.गु.शा पालघर | मिरारोड पो.स्टे | |
| ३८ | जितेंद्र युवराज पाटील | पोनि | ला.प्र.वि, सोलापुर | काशिमिरा पो.स्टे | |
| ३९ | प्रकाश पांडूरंग मासाळ | पोनि | पो.अ.उस्मानाबाद | नवघर पो.स्टे | |
| ४० | जिलानी कादर सय्यद | पोनि | नि.कक्ष ठाणे शहर | नयानगर पो.स्टे | |
| ४१ | महेंद्र राजाराम शेलार | पोनि | पो.अ.रायगड | पेल्हार पो.स्टे | |
| ४२ | सागर चंद्रकांत टिळेकर | पोनि | तुळींज पोस्टे | भाईदर पो.स्टे | |
| ४३ | शाहुराज संभाजीराव रणवरे | पोनि | तुळींज पोस्टेमि.भा.व.वि | गुन्हे शाखा–२ | |
| ४४ | राहुल सदाशिव राख | पोनि | पो.आ नवी मुंबई | गुन्हे शाखा, दविप | |
| ४५ | ऋषीकेश संपत पवळ | पोनि | पो.आ, सोलापूर शहर | वसई पो.स्टे | |
| ४६ | राहुल सखाराम सोनावणे | पोनि | पो.आ नवी मुंबई | नालासोपारा पो.स्टे | |
| ४७ | अभिजीत दत्तात्रय मडके | पोनि | पो.आ नवी मुंबई | माणिकपुर पो.स्टे | |
| ४८ | अब्दुलहक महमदगौस देसाई | पोनि | नियंत्रण कक्ष, मुंबई | वसई पो.स्टे | |
| ४९ | सुजितकुमार तुकाराम गुंजकर | पोनि | मुंबई शहर | सायबर क्राईम, गुन्हे शाखा | |
| ५० | अशोक कठाळु कांबळे | पोनि | अमरावती | माणिकपुर पो.स्टे | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ग्रामिण | | |
| ५१ | मंगेश अरूणराव अंधारे | पोनि | यवतमाळ | उत्तन पो.स्टे | |
| ५२ | अमर अनिल मराठे | पोनि | बुलडाणा | नियंत्रण कक्ष | |
| ५३ | अमरसिंग रंगराव पाटील | पोनि | रत्नागिरी | अर्नाळा पो.स्टे | |
| ५४ | समिर सुरेश अहिरराव | पोनि | नाशिक ग्रामिण | नालासोपारा पो.स्टे | |
| ५५ | मिलींद काळु साबळे | पोनि | पुणे ग्रामीण | वालीव पो.स्टे | |
| ५६ | कुमारगौरव माधवराव धादवड | पोनि | मुंबई शहर | विशेष शाखा | |
| ५७ | सुधिर अर्जुन चव्हाण | पोनि | पिंपरी–चिंचवड | भाईदर पो.स्टे | |
| ५८ | सागर बाबासाहेब इंगोले | पोनि | अमरावती ग्रामिण | गुन्हे शाखा | |
| ५९ | विठ्ठल विराप्पा चौगुले | पोनि | मुंबई शहर | विरार पो.स्टे | |
| ६० | दिलीप हरिभाऊ राख | पोनि | मुंबई शहर | विरार पो.स्टे | |
| ६१ | राहुलकुमार पाटील | पोनि | मि.भा.व.वि | वालीव पो.स्टे | |
| ६२ | देविदास अशोक हंडोरे | पोनि | मि.भा.व.वि | गुन्हे शाखा | |
| ६३ | संतोष सोपान चौधरी | पोनि | सातारा | गुन्हे शाखा | |
| ६४ | शिवानंद शशिकर देवकर | पोनि | जालना | विरार पो.स्टे | |
| ६५ | संजय शांताराम केदारे | पोनि | मुंबई शहर | मानवी संसाधन विभाग | |
| ६६ | सुशिलकुमार शांताराम शिंदे | पोनि | अे.सी.बी, मुंबई | नवघर पो.स्टे | |
| ६७ | धनाजी बाबुराव क्षिरसागर | पोनि | रायगड | गुन्हे शाखा | |
| ६८ | सुरज जयवंत पाडवी | पोनि | नाशिक शहर | गुन्हे शाखा | |
| ६९ | राजेश मदनमोहन ओझा | पोनि | प्रवर्तन निर्देशनालय | नयानगर पोस्टे | |

| मिरा–भाईदर, वसई–विरार आयुक्तलयात कार्यरत पोलीस अधिकारी | | |
|---|---|---|
| अ.क्र. | पदनाम | मंजुर |
| १ | पोलीस आयुक्त | ०१ |
| २ | अप्पर पोलीस आयुक्त | ०१ |
| ३ | पोलीस उप आयुक्त | ०५ |
| ४ | सहाय्यक पोलीस आयुक्त | १२ |
| ५ | पोलीस निरीक्षक | ६९ |
| ६ | सहायक पोलीस निरीक्षक | १०९ |
| ७ | पोलीस उप निरीक्षक | २२४ |
| ८ | बिनतारी संदेश विभाग | ७१ |
| ९ | सहा.पो.उप.नि. | २१९ |
| १० | पोलीस हवालदार | ५५९ |
| ११ | पोलीस नाईक | ७४२ |
| १२ | पोलीस शिपाई | १३७५ |
| १३ | पोलीस शिपाई चालक | १० |
| १४ | स्वीय सहाय्यक | ०१ |
| १५ | स्टेनो | ०३ |
| १६ | प्रमुख लिपीक | ०५ |
| १७ | प्रशासिकीय अधिकारी | ०१ |
| १८ | कार्यकारी अधिकारी | ०२ |
| १९ | सहाय्यक लेखा अधिकारी | ०१ |
| २० | वरिष्ठ श्रेणी लिपीक | १५ |
| २१ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | २१ |
| २२ | कार्यालयीन शिपाई | ०२ |
| २३ | पोलीस निरीक्षक म.पो.तांत्रिक | ०२ |
| २४ | पोलीस उप निरीक्षक म.पो. तात्रिक | ०२ |
| २५ | सहा. फौजदार – तांत्रिक | ०२ |
| २६ | सहा. फौजदार- १, मॅकनिकल | ०२ |
| २७ | पोलीस हवालदार -२, मॅकनिक ग्रेड | ०६ |
| २८ | सहा. फौजदार-३ मॅकनिक | ०६ |
| २९ | पोलीस शिपाई हेल्पर | १० |
| ३० | पोलीस नाईक इलेक्ट्रीशन | ०२ |
| ३१ | लॉन्च स्टाफ | ७८ |
| | एकुण | ३५५८ |